महाराष्ट्रशासन

# शासकीयअभियांत्रिकीमहाविद्यालय, नागपूर

सेक्टर२७, मिहानपुनर्वसनवसाहतखापरी, नागपूर- ४४११०८(महाराष्ट्र)

e-mail: principal.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in • office.gcoenagpur@dtemaharashtra.gov.in

दूरध्वनीक्र. (०७१०३) २९५२२६(P), २९५२२०(O) •Website: www.gcoen.ac.in

"To be an Institution of National Repute Creating Globally Competent Technocrats to Serve the Society"

क्र.शाअमना/शिष्यवृत्ती/2022/6763 दिनांक :

## सन 2022-23 मध्ये तंत्रशिक्षण विभागांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजना

### 1) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजना.

प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात प्रवेशित केंदीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिक मागासवर्गीयांना OPEN/SEBC/EWSप्रवर्गातील सर्व विदयार्थ्यांना सूचित करण्यात येते की, चालु शैक्षणिक वर्ष 2022-23 करीता MAHADTB Portal नविन अर्ज भरणे तसेच अर्ज Renewal करणेबाबतची प्रक्रया सुरु झालेली आहे.

- **योजनेचा लाभ : 50% शिक्षण शुल्क आणि 50% परिक्षा शुल्क**
- **पात्रतेचे निकष : (शासन निर्णय जीआर दिनांक 7 ऑक्टोबर 2017, 1 मार्च 2018, 31 मार्च 2018, 11 जुलै 2019 नुसार)**

  क) अर्जदाराचे नागरिकत्व भारतीय असावे.
  ख) उमेदवार महाराष्ट्राचा राज्याचा रहिवासी (डोमिसाईल) असावा.
  ग) अर्जदार संस्थेचा बोनाफाईड विदयार्थी असावा आणि शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमासाठी पदवी प्रवेश घेतलेला असावा.
  घ) उमेदवाराने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (कॅप) प्रवेश घेतलेला असावा.
  ङ) अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ नये.
  च) चालू शैक्षणिक वर्षासाठी कुटुंबातील फक्त 2 मुलांना या योजनेचा लाभ घेण्याची परवानगी आहे.
  छ) कुटुंबाचे/पालकांचे एकुण वार्षिक उत्पन्न 8 लाखाहुन अधिक नसावे.
  ज) मागील सेमिस्टरमध्ये किमान 75% उपस्थिती आवश्यक आहे. (कॉलेजमध्ये नव्याने प्रवेश घेणारे यास उपवाद आहेत)
  झ) कोर्स कालावधी दरम्यान, उमेदवाराचा शैक्षणिक खंड कालावधी 2 किंवा 2 वर्षापेक्षा जास्त नसावे.
  ञ) ज्यांनी सर्वसाधारण प्रवर्ग आणि एससीबीसी प्रवर्ग घेतला आहे असे उमेदवार पात्र आहेत.

- **सदरील शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याकरीता पात्र विदयार्थ्यांकडे खालील मुळ बाबी असणे आवश्यक आहे.**

  क) दहावी आणि त्यानंतरची मार्कशीट.
  ख) महाराष्ट्र राज्याचा डोमिसाईल असल्याचे प्रमाणपत्र.
  ग) कौंटुंबिक वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र. चालू वर्षिक (2021-2022 चे).
  घ) CAP ID LETTER
  ङ) FEE RECEIPT
  च) चालू वर्षात कुटुंबातील 2 पेक्षा जास्त लाभार्थी नाही असे प्रतिज्ञापत्र.
  छ) बायोमेट्रिक उपस्थितीचा पुरावा.
  ज) आधारकार्ड मध्ये स्वत:चा ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर Update असणे.
  झ) इंडियन पोस्टल पेमेंट बँकेचे (IPPB) चे बचत खाते असणे.

## 2) डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना.

प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षात प्रवेशित केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेले असे विदयार्थी , ज्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत असे सक्षम प्राधिकरणाव्दारे प्रमाणित केले आहे., अशा विदयार्थ्यांसाठी ही योजना आहे. अशा सर्व विदयार्थ्यांना सूचित करण्यात येते की, चालु शैक्षणिक वर्ष 2022-23 करीता MAHADTB Portal नविन अर्ज भरणे तसेच अर्ज Renewal करणेबाबतची प्रक्रया सुरु झालेली आहे.

➢ योजनेचा लाभ :

- **नोंदणीकृत कामगार/अल्पभूधारक (मार्जिनल जमीन धारक) च्या मुलासाठी**
  A) एमएमआरडीए/पीएमआरडीए/औरंगाबाद शहर/नागपूर शहरातील संस्थांसाठी रु. 30,000/- 10 महिण्यांसाठी
  B) इतर क्षेत्रातील संस्थेसाठी रु. 20,000/- 10 महिन्यांसाठी
- **वार्षिक कौटुंबिक उप्तन्न 8 लाखांपर्यंत असलेल्यांकरीता**
  A) एमएमआरडीए/पीएमआरडीए/औरंगाबाद शहर/नागपूर शहरातील संस्थांसाठी रु. 10,000/- 10 महिण्यांसाठी
  B) इतर क्षेत्रातील संस्थेसाठी रु. 8,000/- 10 महिन्यांसाठी

➢ **पात्रतेचे निकष : (शासन निर्णय जीआर दिनांक 7 ऑक्टोबर 2017, 22 फेब्रुवारी 2018, 1 मार्च 2018, 18 जून 2018, 11 जुलै 2019 नुसार)**

क) अर्जदाराचे नागरिकत्व भारतीय असावे.
ख) उमेदवार महाराष्ट्राचा राज्याचा रहिवासी (डोमिसाईल) असावा.
ग) अर्जदार संस्थेचा बोनाफाईड विदयार्थी असावा आणि शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या व्यावसायिक आणि तांत्रिक अभ्यासक्रमासाठी पदवी प्रवेश घेतलेला असावा.
घ) उमेदवाराने केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे (कॅप) प्रवेश घेतलेला असावा.
ङ) अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्तीचा लाभ घेऊ नये.
च) चालू शैक्षणिक वर्षासाठी कुटुंबातील फक्त 2 मुलांना या योजनेचा लाभ घेण्याची परवानगी आहे.
छ) कुटुंबाचे/पालकांचे एकुण वार्षिक उत्पन्न 8 लाखाहुन अधिक नसावे.
ज) मागील सेमिस्टरमध्ये किमान 75% उपस्थिती आवश्यक आहे. (कॉलेजमध्ये नव्याने प्रवेश घेणारे यास उपवाद आहेत)
झ) कोर्स कालावधी दरम्यान, उमेदवाराचा शैक्षणिक खंड कालावधी 2 किंवा 2 वर्षापेक्षा जास्त नसावे.
ञ) ज्यांनी सर्वसाधारण प्रवर्ग आणि एससीबीसी प्रवर्ग घेतला आहे असे उमेदवार पात्र आहेत.

➢ **सदरील शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेण्याकरीता पात्र विदयार्थ्यांकडे खालील मुळ बाबी असणे आवश्यक आहे.**

क) दहावी आणि त्यानंतरची मार्कशीट.
ख) महाराष्ट्र राज्याचा डोमिसाईल असल्याचे प्रमाणपत्र.
ग) कौंटुंबिक वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्र. चालू वर्षिक (2021-2022 चे).
घ) CAP ID LETTER
ङ) FEE RECEIPT
च) चालू वर्षात कुटुंबातील 2 पेक्षा जास्त लाभार्थी नाही असे प्रतिज्ञापत्र.
छ) बायोमेट्रिक उपस्थितीचा पुरावा.
ज) आधारकार्ड मध्ये स्वत:चा ई-मेल आय.डी. व मोबाईल नंबर Update असणे.
झ) इंडियन पोस्टल पेमेंट बँकेचे (IPPB) चे बचत खाते असणे.
ञ) वसतीगृह पावती/भाडेतत्वावर राहत असल्यास करारनामा, घरमालकाचे आधारकार्ड व पॅनकार्ड/संस्थेचे हमीपत्र.

➢ टिप

1. उमेदवाराने महाराष्ट्र शासनाच्या वेबसाइट या महाडीबीटी पोर्टलवर उपलब्ध असलेल्या वापरकर्ता पुस्तिकेचा वापर करावा. उमेदवार त्यातील सूचनांचे पालन करावे आणि अर्ज भरण्याच्या शेवटच्या तारखेपुर्वी ऑनलाईन अर्ज भरावा.
2. वर दिलेली माहिती केवळ संदर्भाकरिता देण्यात आलेली आहे. उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत शिष्यवृत्ती योजनेच्या पात्रतेच्या निकष, आवश्यक कागदपत्रे इत्यादी संदर्भातील नवीनतम माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे. उमेदवारांनी वेबसाइट पाहणे आवश्यक आहे.
3. शिष्यवृत्तीची रक्कम उमेदवाराच्या बँक खात्यात वितरीत होणेकरीता त्यांना आपला आधार नंबर बँक खात्याशी लिंक करणे आवश्यक आहे किंवा उमेदवाराचे इंडियन पोस्टल पेमेंट बँकेचे (IPPB) चे बचत खाते असणे आवश्यक आहे.

(प्रा. पी. व्ही.नंदनकर)
नोडल अधिकारी शिष्यवृत्ती,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपुर

(डॉ. रेवतकुमार बोरकर)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय,
नागपुर

प्रत : 1) सर्व प्रवेशित विदयार्थी, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता, देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या पालकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

2) प्रोग्रामर, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर यांना महाविदयालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्याकरीता.

3) विदयार्थी विभाग, सुचना फलक शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय, नागपूर.

4) सर्व विभागप्रमुख यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरची सुचनाविभागाच्या सुचना फलकावर लावून तसेच विभागाच्या Whatsapp Group व्दारेआपल्या विभागातील विदयार्थ्यांना निदर्शनास आणून दयाव्यात.